तरुण भारत
Apla Nagpur | 2023-01-26 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# आयआयएम नागपूरला व्यवस्थापन शिक्षण उत्कृष्टता पुरस्कार

◆ **नागपूर, २५ जानेवारी**

नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या फ्युचर ऑफ मॅनेजमेंट कॉनक्लेव्हमध्ये आयआयएम नागपूरला व्यवस्थापन शिक्षण उत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात आला. बिझनेस वर्ल्डतर्फे आयोजित या समारंभात आयआयएम नागपूरला हा प्रतिष्ठित पुरस्कार संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी स्वीकारला. हा पुरस्कार दरवर्षी मॅनेजमेंट स्कूल्स प्रदान करण्यात येतो. त्यात यावर्षी आयआयएम नागपूरने तो मिळविला. आयआयएम नागपूरने औद्योगिक प्रशिक्षणातील सर्वोत्कृष्ट बी स्कूलचा पहिला पुरस्कार मिळविला. आयआयएम कलकत्ता यांना




सर्वोत्कृष्ट डिजिटल तंत्रज्ञान पुरस्कार, तर रमाय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटला इमर्जिंग बी स्कूल म्हणून गौरविण्यात आले.

याप्रसंगी बोलताना, डॉ. मेत्री यांनी समूह चर्चेत भाग घेताना या दोहोंमध्ये अंतर असल्याचे सांगितले.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments